# रे.दि.मु.नं. ५८/२००९ निशाणी ३६ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादींनी कलम १० दिवाणी प्रक्रिया संहिता नुसार दाखल केला आहे.

प्रतिवादी/अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत दावा वादीने कायम मनाई हुकूम मिळणे करीता दाखल केला आहे या मधील वाद मिळकत ही प्रतिवादींनी दाखल केलेली रे.दि.मु.नं. १०/०९ मधील आहे व एकाच मिळकती संबंधी दोन दावे दाखल झाले आहेत, प्रतिवादींचा दावा अगोदरचा असुन तो दिवाणी न्यायाधीश यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे वादी वाद मिळकतीचे कायदेशीर वारस नाहीत केवळ नोंदी वरुन तो हक्क सांगत आहे दोन्ही दाव्याची चौकशी एकत्रात होणे गरजेचे आहे व दोन्ही दावे वेग वेगळया न्यायालया समोर असल्यामुळे वेग वेगळे निकाल लागुन गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे म्हणुन रे.दि.मु.नं. १०/०९ या दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रस्तुत दावा स्थगित ठेवावा.

निशाणी क्र. ३७ वर वादीने लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला त्यांच्या म्हणण्यानुसार रे.दि. मु. नं. १०/०९

हा महसुल नोंदी बेकायदेशीर आहेत व वादी मालक आहेत असे जाहीर करुन मिळणे करीता दाखल केला आहे. तर प्रस्तुत दावा कायम मनाई हुकुमा करीता दाखल केला आहे या दाव्यात प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द विना कैफियत दावा चालविणेचा आदेश झालेला आहे त्यामुळे हा अर्ज कायदेशीर नाही प्रतिवादींनी जो पुर्वीचा दावा दाखल केला त्यामध्ये प्रस्तुत वादीकडुन मिळकतीचा कब्जा मिळावा अशी देखिल विनंती केली आहे, दोन्ही प्रकरणा मधील मागण्या वेग वेगळया आहेत त्यामुळे हा दावा स्थगित ठेवणेची आवश्यकता नाही म्हणुन अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

अर्ज त्यावरील म्हणणे व कागदपत्रांचा विचार केल्यानंतर असे दिसुन येते की, प्रतिवादींनी या दाव्या पुर्वीच रे.दि.मु. नं १०/०९ दाखल केलेला आहे त्यामध्ये असणारी मिळकत ही प्रस्तुत दाव्यातील मिळकत आहे, हे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यात कायम मनाई हुकुम मिळण्याची मागणी केली आहे तर प्रतिवादींनी दाखल केलेल्या दाव्यामध्ये जाहीरनाम्याची मागणी केली आहे. त्यामुळे तसा गुंतागुंतीचा कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही प्रतिवादीच्या वकिलांनी युक्तिवादामध्ये प्रतिवादींचा दावा क्र. १०/०९ हा पुर्वीचा आहे त्यामध्ये

प्रस्तुत वादीच्या नावाची नोंद रद्द करुन मागितली आहे प्रतिवादीचा कोणताही संबंध नाही केवळ फेरफारा वरुन मालकी मिळत नाही, प्रस्तुत प्रतिवादींनी वादीकडुन वाद मिळकतीचा कब्जा देखिल घेतला आहे व हा प्रस्तुत दावा सध्या मनाई हुकूमा करीता आहे हे कायदेशीर नाही म्हणुन ही कार्यवाही स्थगित ठेवावी किंवा दोन्ही दावे एकत्रात चालवावेत म्हणजे वेग वेगळे निकाल येणार नाहीत अशी मागणी केली. वादीच्या वकिलांनी त्यांच्या म्हणण्या प्रमाणे त्यांचा युक्तिवाद आहे असे सांगितले. संपुर्ण परिस्थितीचा विचार केल्यानंतर मी हया निष्कर्षास आलेलो आहे की, एक दावा सह दिवाणी न्यायाधीश पाटण यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे तर हा दावा दिवाणी न्यायाधीश यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे गुंतागुंत होण्याची कुठलिही शक्यता दिसुन येत नाही तरी देखिल नैसर्गिक न्याय तत्वा नुसार जर दोन्ही दावा एकत्र चालविले तर दोन्ही पक्षकारांच्या सोयीचे होईल व कुठलिही गुंतागुंत होणार नाही म्हणुन मी खालील आदेश देत आहे.

## **आदेश**

१. अर्ज पाहुन दाखल करणेत येतो.

२. प्रतिवादींना मुभा देण्यात येते की, त्यांनी मा. जिल्हा न्यायालय सातारा यांचेकडे योग्य तो अर्ज करुन दोन्ही दावे एकत्रात एकाच कोर्टा समोर चालतील याची तजवीज करावी.

३. पुढील तारखेपर्यंत प्रतिवादींनी योग्य ती कार्यवाही करावी नसता प्रकरण उलट तपासणीसाठी ठेवण्यात यावे.

(कि.रं. देशपांडे)
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
पाटण.

दि. ०८/०८/२०१२